दिनांक ०२/०६/२०२१

**प्रसिध्दी पत्रक**

**आरोपी लोकसेवक दत्तात्रय लक्ष्मण दिंडकर, निरीक्षक- राज्य उत्पादन शुल्क विभाग, बीड यांनी तक्रारदार यांचेकडे ७५,०००/- रु लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ५०,०००/- रु स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादची बीड येथे कारवाई**

| | | |
|---|---|---|
| आलोसे यांचे नाव व हुद्दा | :- | दत्तात्रय लक्ष्मण दिंडकर, पद- निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, बीड वर्ग-२ |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे शिवाजीनगर, जिल्हा बीड येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्री. विकास घनवट, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागणी रक्कम | :- | ७५,०००/- रुपयाची मागणी करुन ५०,०००/- रुपये स्विकारले |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे विरुद्ध दाखल असलेल्या गुन्ह्यात मदत करुन त्यांचे नाव गुन्ह्यामधुन कमी करण्यासाठी |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार विरुद्ध दाखल असलेल्या गुन्ह्यात मदत करुन त्याचे नाव गुन्ह्यामधुन कमी करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे दत्तात्रय दिंडकर, पद- निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, बीड यांनी ७५,०००/- रुपये लाचेची मागणी करत असल्याची तक्रार तक्रारदार यांनी नोंदविली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, दत्तात्रय दिंडकर, पद- निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, बीड यांनी तक्रारदार यांचेकडे ७५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन ५०,०००/- लाच स्विकृतीस मान्यता दिल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज रोजी सापळा आयोजीत केला असता, दत्तात्रय लक्ष्मण दिंडकर, पद- निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, बीड (वर्ग-२) यांनी ५०,०००/- रुपये लाचेची रक्कम स्वतःचे कार्यालयात स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन, शिवाजीनगर जि. बीड येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, प्रभारी अपर पोलीस अधीक्षक मा. मारुती पंडीत, पोलीस उपअधीक्षक श्री. बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. विकास घनवट यांनी केली आहे. त्यांना याकामी पोना- रविंद्र काळे, भुषण देसाई, पोलीस अंमलदार- मिलींद इप्पर व चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID :-**1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

**(बी.व्ही.गावडे)**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग**
**औरंगाबाद.**